पुण्य नगरी

# आर्थिक विकास देशातील कायद्याच्या चौकटीवर अवलंबून : खेतान

**पुणे** : उद्योगक्षेत्रातील चुकीच्या पद्धती, नियमांचे अडथळे आणि आर्थिक विषमता यामुळे आपले कॉर्पोरेट वातावरण सातत्याने डागाळले जात आहे. शाश्वत व समावेशक वाढीच्या युगाला वाट करून देण्याची जबाबदारी विधी व न्यायसंस्था आणि प्रशासनातील सहयोगावर येऊन पडली आहे. आज आर्थिक विकास हा प्रामुख्याने देशातील कायद्याच्या चौकटीवर अवलंबून आहे, असे मत एयू कॉर्पोरेट अँड लिगल ॲडव्हायजरी सर्व्हिसेसचे (एयूसीएल) संस्थापक अक्षत खेतान यांनी व्यक्त केले.

कॉर्पोरेट व्यूहरचना, आर्थिक सल्ला, कर्ज करार, दावे-खटले आदी विषयांवर त्यांनी संवाद साधला.

अक्षत खेतान म्हणाले, उद्योगक्षेत्रातील व्यापक बदल वेगाने होत आहेत. प्रकरणांवर तोडगा काढण्यासाठी स्पष्ट मार्ग आखून दिला जाण्याची गरज आहे. त्याचबरोबर तरुण व्यावसायिकांमध्ये व्यावसायिक मानसिकतेला उत्तेजन देणे, डिजिटल स्पर्धेचे व्यवस्थापन करण्यासाठी नियमांची चौकट प्रस्थापित करणे आणि राज्यस्तरांवरील कर मोडीत काढून इंधन व वीज हेदेखील वस्तू व सेवा कराच्या (जीएसटी) कक्षेत आणणे हे महत्त्वाचे आहे.

भविष्यकाळाकडे जाताना विकास, नीतिमत्ता व पारदर्शकता राखण्याच्या दृष्टीने विधी आणि न्यायव्यवस्था, आघाडीचे उद्योजक व सरकारी यंत्रणा ह्यांच्यात संवादाची जोपासना होणे आवश्यक आहे.

विश्वास, जबाबदारी आणि नवोन्मेष या माध्यमातून कॉर्पोरेट भारत जोमाने वाढत जाणार असून, जागतिक आर्थिक विश्वात समतोल प्रगतीचे उदाहरण घालून देणार आहे, असे त्यांनी सांगितले.